Tweet 0

## गोव्याचे मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर यांचे प्रतिपादन

# उद्योजकांमध्ये अपयश पचविण्याची ताकद पाहिजे

**मुंबई** | दि. ३१ (प्रतिनिधी)

**ज्या** उद्योजकांमध्ये अपयश पचविण्याची ताकद असते तेच यशस्वी होऊ शकतात, असे प्रतिपादन गोव्याचे मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर यांनी केले. उद्योजकांचे चारित्र्य त्यांच्या चिरकाल यशासाठी महत्त्वाचे आहे, हेही त्यांनी पुढे विशद केले.

उद्योगश्री प्रकाशन आयोजित उद्योगश्री जीवनगौरव सन्मान सोहळ्यात ते बोलत होते. या सोहळ्यासाठी कॅम्लिनचे सुभाष दांडेकर, ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर, साहित्यिक मधू मंगेश कर्णिक, केसरीचे केसरी पाटील आणि माजी खासदार एकनाथ आव्हाड या मान्यवरांनी निवड समितीची भूमिका बजावली.



उद्योगश्री प्रकाशनातर्फे गोव्याचे मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर यांच्या हस्ते इंडोको समूहाचे सुरेश कारे यांना उद्योगश्री जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात आले.

याप्रसंगी मनोहर पर्रीकर यांनी आधुनिक माहिती तंत्रज्ञानाशी सांगड घालत जुन्या पद्धतींचाही ताळमेळ कसा साधावा, याबद्दलही विचार मांडले. या सोहळ्यात इंडोको रेमेडीजच्या सुरेश कारे यांना 'उद्योगश्री जीवनगौरव सन्मान' देऊन गौरविण्यात आले.

या सोहळ्यात विविध क्षेत्रांतील ११ उद्योजकांना त्यांच्या कार्यासाठी गौरविण्यात आले. या वेळी उद्योजकांनी क्षेत्रात येणाऱ्या नवीन पिढीलाही अनुभव कथनातून मार्गदर्शन केले.